512

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक २१/०१/२०२५.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. एसपीपी -०२२४/ प्रक.४७/पोल-१० दि.२० जानेवारी २०२५

**विषय :-** नयानगर पो.ठा गु.र.क्र.३४/२०२४ मधून उध्दवलेल्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियूक्त करण्यात आलेल्या ॲड.कौशिक म्हात्रे यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत

*******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. एसपीपी -०२२४/ प्रक.४७/पोल-१०, दि.२० जानेवारी २०२५, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०१२०१५४७१०३८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,
पोलीस आयुक्त,मिरा-भाईंदर,वसई-विरार
कार्यासन अधिकारी का .क्र.१४

प्रत:-
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था ) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था ) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**नयानगर पो.ठा. गु.र.क्र.३४/२०२४ मधून उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.कौशिक म्हात्रे, यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसपीपी-०२२४/प्र.क्र.४७/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
**दिनांक:** २०.०१.२०२५.

**संदर्भ :-** १.पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र.पोमसं/१४/६६/वि.स.अ.म्हात्रे/पो.आ.मि.भा.व वि./७७/२०२४ दि.१४.०२.२०२४.
२.शासन पत्र, विधि व न्याय विभाग, क्र.०८/एसपीपी/ 'ए' ब्रँच, दि.२६.०२.२०२४.
३.शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्र. एसपीपी २०२४/यु.ओ.आर.२६/ डी-१४,दि.२७.०२.२०२४.
४.शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम,दि. २९.०७.२०१५.
५.शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम,दि. १६.०६.२०१७.

**शासन निर्णय :-**

नयानगर पो.ठा. गु.र.क्र.३४/२०२४ या दाखल गुन्ह्यातून उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणात मा.जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई या न्यायालयांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी विधि व न्याय विभागाने, संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२६.०२.२०२४ च्या पत्रान्वये व संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२७.०२.२०२४ च्या अधिसूचनेन्वये ॲड.कौशिक मदन म्हात्रे यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून काम पाहण्यासाठी ॲड. कौशिक मदन म्हात्रे यांना खालीलप्रमाणे व्यावसायिक फी अदा करण्यास मान्यता या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रतिदिन परिणामकारक सुनावणी करीता व्यावसायिक फी |
|---|---|---|
| १ | मा.जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे | रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) |
| २ | मा.उच्च न्यायालय, मुंबई. | रु.२५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) |

सदर फी व्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ ॲड.कौशिक म्हात्रे यांना अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही अपरिणामकारक सुनावणीकरीता फीचे प्रदान करण्यात येणार नाही.

३. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधित प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा पर्यवेक्षीय अधिकाऱ्याकडून तसेच संबंधित मा. न्यायालयाच्या प्रबंधकाकडून तपासून प्रमाणित करून घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी घ्यावी.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या "मागणी क्रमांक बी-१, २०५५ पोलीस -(००)१०९, जिल्हा पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८)- २८ व्यावसायिक सेवा" या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधीन आणि मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा.

**५.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४७७/२०२१/व्यय-७, दि.१२.०७.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार आणि संदर्भ क्र. ४ व ५ मधील वित्त विभाग शासन निर्णयानुसार, मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायालयीन प्रकरणी नेमण्यात आलेल्या विशेष सरकारी अभियोक्त्यांना फी अदा करण्यासंदर्भात प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०१२०१५४७१०३८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MURLIDHAR
MADANRAO MUNDE

Digitally signed by MURLIDHAR MADANRAO MUNDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=6ce40b982ce0fd403128e2717e7e0c7b7377fd69d7d23790cb110e33b1e0491e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=716527D5A822F9E40134FCE6C6C6B8E1521D5C66E1D2D46A3F04B04DE16DF388, cn=MURLIDHAR MADANRAO MUNDE
Date: 2025.01.20 15:48:37 +05'30'

**( मुरलीधर मुंडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, मिरा- भाईंदर, वसई-विरार.
३. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नयानगर पोलीस ठाणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र- १, मुंबई.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
६. विधि व न्याय विभाग (अ शाखा/कार्यासन-१४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
८. ॲड.कौशिक मदन म्हात्रे, ऑफिस क्र.४०९६, २ रा मजला, रुस्तुमजी इ झोन मॉल, गोरेगांव-मुलुंड लिंक रोड, मलाड (प.) मुंबई-४०००६४.
९. निवड नस्ती (पोल-१०).